DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

# A STUDY ON THE CURRENT STATUS OF EDUCATION FOR STUDENTS WITH LEARNING DISABILITIES: DEVELOPMENT AND EVALUATION OF A REMEDIAL ACTION PROGRAM

https://orcid.org/0009-0003-43529-4686

https://orcid.org/0009-0001-5260-0046

**DR. KISHORE JASWANTSINH KSHATRIYA**
Ph.D. Supervisor
Shri Shivaji Education College, Amravati.

**PRAFULLA JAYADEVARAO TAREKAR**
Research Scholar
*prafullatarekar@gmail.com*

Received: 06.08.2024 Reviewed :08.08.2024 Accepted: 10.08.2024

***ABSTRACT***

*Recognizing the needs of students with learning disabilities, as well as children with special needs, and integrating them into the mainstream education system to complete their primary and secondary education has now become a legal mandate. It is the responsibility of every segment of society to provide educational support services that reduce the challenges faced by such students, fostering an egalitarian approach in both society and schools. Within the category of children with special needs, there are 21 recognized types, some of which require medical assistance. However, children with learning disabilities primarily need support tailored to their specific educational challenges. By accurately identifying these challenges and implementing targeted interventions, their interest and enthusiasm for education can be sustained, allowing them to complete their primary and secondary schooling. For this to happen, the attitude of the teachers and their engagement with these students is crucial in ensuring equal educational opportunities.*

***KEY WORDS:*** *students, challenges, specific*

## अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या सद्यास्थितीचा आढावा घेऊन अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक कृती कार्यक्रमाचे विकसन करून त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास

**सारांश**

अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्याही आवश्यकता ओळखून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांचे प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील शिक्षण पूर्ण करणे आता कायद्यानेच बंधनकारक झाले आहे. अशा विद्यार्थ्यांची शिक्षणातील आव्हाने कमी करून समाजात व शाळेत समतात्मक दृष्टीकोनातून समान संधी मिळण्यासाठी शैक्षणिक सहाय्यभूत सेवा उपलब्ध करून देणे ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे.विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या वर्गवारीचा विचार केल्यास २१ प्रकारातील विशेष गरजा असणारे विद्यार्थी यामध्ये आढळतात. यामध्ये काहींना वैद्यकीय दृष्टीकोनातून मदत मिळणे आवश्यक असते. परंतु अध्ययन अक्षम या विशेष गरजा असणाऱ्या मुलांना अध्ययनार्थीच्या दृष्टीकोनातून मदत मिळणे गरजेचे असते. या मुलांची नेमकी अडचण समजून घेऊन त्यांना त्यावर मात करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम घेतले तर या

मुलांचा शिक्षणातील उत्साह टिकून राहतो व पुढे जाऊन ते आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण करु शकतात. परंतु याकरिता त्यांना अध्यापन करणाऱ्या शिक्षकांचा त्यांच्या प्रती असलेला दृष्टीकोन आणि त्यांची या विद्यार्थ्यांच्या संदर्भातील अभिरुची यांची भूमिका शिक्षणाच्या संदर्भात समान संधीची उपलब्धता करण्यामध्ये महत्त्वपूर्ण आहे.

प्रत्येक व्यक्ती अद्वितीय असते. प्रत्येक व्यक्ती ही इतरांपेक्षा भिन्न असते हा निसर्गाचा नियम आहे. पशुपक्षी, प्राणी, वनस्पती यांच्यात काहीना काही भेद असतो. त्याचप्रमाणे मानवात देखील एक मानव दुसऱ्यापेक्षा भिन्न असतो. व्यक्तीच्या रंगरुपावरून त्यांच्यातील भिन्नता आपल्या चटकन लक्षात येते. तसेच काही अंतर्गत बाबतीतही भिन्नता आपणाला दिसून येते. जसे एखादी व्यक्ती अत्यंत हुशार तर दुसरी सामान्य असू शकते. प्रत्येक व्यक्तीच्या गरजा विविध असतात. अध्ययनाच्या बाबतीत ही भिन्नता आपणास दिसून येते. समाजात अशा काही व्यक्ती असतात की ज्यांना त्यांच्या शारीरिक आणि मानसिक क्षमतेनुसार औपचारिक आणि अनौपचारिक शैक्षणिक संरचनेत उपलब्ध असलेल्या अध्ययन अध्यापन प्रणालीपेक्षा विशेष सुविधा पुरवण्याची गरज असते. अशा बालकांना अपवादात्मक (Exceptional) किंवा विशेष (Special) बालके असे म्हटले जाते आणि त्यांच्या शैक्षणिक गरजा विशेष शिक्षणातून पूर्ण केल्या जातात.

विद्यार्थ्यांच्या वैविध्यपूर्ण गरजांची पूर्तता करणारी शिक्षण व्यवस्था ही यशस्वी मानली जाते. समावेशक शिक्षणाद्वारे विविध गरजा असणाऱ्या बालकांच्या शैक्षणिक गरजांची पूर्तता केली जाते. भिन्न क्षमता असूनही विशेष गरजा असलेल्या बालकांना सामान्य बालकांसमवेत एकाच वर्गात शिकण्याची समान संधी ज्या शिक्षणात दिली जाते, त्यास समावेशक शिक्षण असे म्हणतात. हे शिक्षण 'समान संधी' या तत्वावर आधारलेले असून या शिक्षणपध्दतीच्या मुख्य प्रवाहात सर्वांचा स्वीकार केला जातो.

**संशोधनाची गरज व महत्व :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांचा अभ्यास केला आहे.अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांच्या विशेष गरजा असतात. या गरजांचा शोध घेऊन त्यावर मात करण्यासाठी वेगवेगळ्या कृती मुलांना करायला लावल्याने त्यांचा अध्ययन प्रक्रियेतील उत्साह टिकून राहतो यासाठी त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा त्यांच्या प्रती असणारा दृष्टीकोन व त्याबाबतची अभिरूची या बाबी अतिशय महत्वाच्या ठरतात.

शिक्षण हक्क कायद्यानुसार सर्व मुलांना शिक्षणाच्या मुळ प्रवाहात सामावून घेणे बंधनकारक असल्याने अशी विशेष गरजा असणारी मुले सर्वसामान्य शाळांमध्ये शिकत असतात त्यामुळे त्यांना इतर मुलांप्रमाणे सामान्य शिक्षकच त्यांना अध्ययन अनुभव देत असतात. अध्ययन अक्षमता असलेले विद्यार्थी आणि सामान्य विद्यार्थी यांना एकाच ठिकाणी शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. सामान्य शिक्षकांना विशेष शिक्षक या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या अध्ययन अनुभवाच्या संदर्भात मार्गदर्शन करतात आणि त्या मार्गदर्शनाच्या अंतर्गत शिक्षक गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देण्याचे कार्य करतात. तसेच शिक्षक निर्धारित कालावधीमध्ये या विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देतात अशा स्थितीत शिक्षक यांचा या विशेष गरजा असलेल्या शिक्षकांच्या संदर्भातील दृष्टीकोन कसा आहे? तसेच या विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देत असतांना त्यांची या विद्यार्थ्यांच्या बाबतीत अभिरुची कशी आहे? याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. कारण शिक्षकांचा विद्यार्थ्यांच्या प्रती असलेला दृष्टीकोन सकारात्मक असेल तसेच या अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना समजून घेण्याची प्रवृत्ती

त्यांच्यामध्ये असेल तर या विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये सकारात्मक बदल होण्यास मदत होते शिवाय दृष्टीकोनाबाबत सकारात्मक प्रवृत्तीबरोबरच या विद्यार्थ्यांना अध्ययन अनुभव देत असतांना त्यांच्या संदर्भात अभिरुची सुध्दा या विद्यार्थ्यांच्या अध्ययन अक्षमतेच्या संदर्भातील समस्येवर मात करण्यास महत्त्वपूर्ण आहे अशा स्थितीत या शिक्षकांची विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत असलेला दृष्टीकोन आणि अभिरुचीचा अभ्यास वस्तुस्थितीचा अभ्यास करुन त्या संदर्भातील समस्यांची सोडवणूक करणे आवश्यक आहे. याच दृष्टीकोनातून प्रस्तुत संशोधन आवश्यक आहे.

## संशोधन निबंध विषय

**अध्ययन अक्षम विद्यार्थ्याच्या शिक्षणाच्या सद्यास्थितीचा आढावा घेऊन अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक कृती कार्यक्रमाचे विकसन करून त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास.**

## संशोधन निबंध विषयाची उद्दीष्टे -

1.शिक्षकांचा अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांबाबतच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.

2.शिक्षकांचा अध्यययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांबाबतच्या अभिरूचीचा अभ्यास करणे.

3.अध्ययन अक्षम विद्यार्थ्याच्या शिक्षणाच्या सद्यास्थितीचा आढावा घेऊन अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक कृती कार्यक्रमाचे विकसन करणे.

4.अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक कृती कार्यक्रमाचे विकसन करून त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

## संशोधन निबंध विषयाची परिकल्पना

1. शिक्षकांचा अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांबाबतच्या दृष्टीकोनामध्ये सार्थ फरक नाही.

१. अध्ययन अक्षम विद्यार्थ्यांसाठी उपचारात्मक कृती कार्यक्रमाचे विकसन सार्थक दिसून येते.

## निष्कर्ष व शिफारशी

1. अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांबाबत शिक्षकांचा दृष्टीकोन सकारात्मक दिसतो.
2. अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांबाबत शिक्षकांची अभिरूची उच्च आढळली आहे.
3. अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसाठी पूरक अध्ययन-अध्यापन पध्दती वापरुन त्याचे सामान्य वर्गातच समावेशन केले जाऊ शकते.
4. अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना अध्ययन अध्यापनात अडचणी येतात त्यांच्यासाठी विशेष शाळा व शिक्षकांची गरज आहे असे निदर्शनास आले.
5. अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांच्या शैक्षणिक समावेशनासाठी पालक, शिक्षक यांच्या सामाईक प्रयत्नांची गरज असल्याचे निदर्शनास आले.
6. अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांच्या क्षमता विचारात घेऊन त्यांना अध्ययन-अध्यापन केले जावे.
7. विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेऊन उपचारात्मक शिक्षण प्रदान करावे असे निदर्शनास आले.
8. विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेऊन उपचारात्मक शिक्षण प्रदान करावे असे निदर्शनास आले.
9. अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी मुलांच्या समस्येनुरुप उपचारात्मक अध्ययन-अध्यापन तंत्राचा वापर, शैक्षणिक साधनांचा वापर, सहशालेय उपक्रमात मुलांचा कृतीयुक्त सहभाग असे उपाय बहुतांश शिक्षकांनी सुचविले आहेत.
10. 1अध्ययन अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकाने सुलभक, मार्गदर्शकाची भूमिका पार पाडावी असे निदर्शनास आले.

## संदर्भ ग्रंथ सूची

1. आगलावे, प्रदीप. (2000). *संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे*. नागपूर: विद्या प्रकाशन, प्रथम आवृत्ती.

2. गुळवणी, मेघा, विश्राम. (2009). *मार्गदर्शन व समुपदेशन.* पुणे : नित्य नूतन प्रकाशन, प्रथम आवृत्ती.
3. घाटोळे, रा. ना. (2000). *समाजशास्त्रीय संशोधन तत्वे व पध्दती.* नागपूर: श्री. मंगेश प्रकाशन, प्रथम आवृत्ती.
4. थोटे, पुरुषोत्तम .(2000). *समाजकार्य संशोधन आणि प्रबंध लेखन.* नागपूर: विद्या प्रकाशन, प्रथम आवृत्ती.
5. देशपांडे, के. ना. व माळी. आ. ल. (2006) *भारतीय शिक्षणाचा इतिहास स्वातंत्र्योत्तर शिक्षण*, पुणे : नित्य नूतन प्रकाशन, प्रथम आवृत्ती.